'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 61 : Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
August-2018

# सेतुमाधवराव पगडी कृत 'महाराणी ताराबाई कालीन स्वातंत्र्यसंग्राम'

प्रा. शिल्पा शेटे
श्री पद्ममणि जैन महाविद्यालय पाबळ,
ता. शिरूर, जि. पुणे.

सेतुमाधवराव पगडी यांनी इतिहासलेखनात अत्यंत महात्त्वाची भूमिका बजावली आहे. विशेषतः मराठयांचा इतिहास हा पगडींचा अत्यंत जिव्हाळयाचा व चिंतनाचा विषय होता. म्हणूनच मराठयांच्या इतिहासाविषयी पगडींनी अत्यंत विस्तृत लेखन केले आहे. छ. शिवाजी महाराज, छ. संभाजी राजे, महाराणी ताराबाई, मराठयांचा स्वातंत्र्यसंग्राम, मराठे व निजाम संबंध, पानीपतचा संग्राम इ. अनेक विषयांसंबंधी पगडींनी लेखन केले आहे. यासंबंधातील विविध कागदपत्रे विशेषतः फार्सी व साधनांचे त्यांनी केलेले अनुवाद या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात. मराठयांच्या स्वातंत्र्यसंग्रामाविषयीही पगडींनी विस्तृत लेखन केले आहे.

मराठयांच्या इतिहासाचे महत्त्व केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादीत नसून ते पूर्ण राष्ट्रीय जीवनात महत्त्वाचे असल्याचे पगडी नमूद करतात. ते म्हणतात, "भारतातील अठरावे शतक हे मराठयांचे शतक आहे. मराठयांच्या अस्मितेला शिवाजी महाराजांनी जागृत केले. आणि स्वधर्म स्वसंस्कृती यांवरील निष्ठेने प्रेरीत होऊन मराठयांनी भारतीय जनतेला तुर्क-मोगल व्याप्त इतिहासाची चार शतके विसरायला लावून भारतीयांचा आत्मविश्वास जागृत केला. ही महनीय कामगीरी महाराष्ट्राला सदैव स्फूर्ती देत राहील यात शंका नाही."[१]

याच १८ व्या शतकाची सुरूवात महाराणी ताराबाई यांच्या पराक्रमाने होते. मराठयांनी औरंगजेब बादशहाला अत्यंत कडवी झुंज दिली व मराठयांचे राज्य पर्यायाने दक्षिण भारत मोगलांच्या ताब्यात जाण्यापासून वाचविला. एवढेच नव्हे तर पुढे भारतभर या राज्याचा विस्तार केला. या स्वातंत्र्ययुद्धातील एक महात्त्वाचा दुवा म्हणजे महाराणी ताराबाई होत. १८ व्या शतकाच्या सुरूवातीला महाराणी ताराबाई यांनी जे कतृत्व गाजविले ते विलक्षण असेच होते. कारण शक्तीमान मोगल सम्राट औरंगजेबाचे आव्हान स्वीकारणे सोपी गोष्ट नव्हती. महाराणी ताराबाईच्या काळात हे स्वातंत्र्ययुद्ध अधिक तीव्रपणे लढविले गेल्याचे पगडींचे मत आहे. या काळात अनेक सरदारांच्या मदतीने ताराबाईने मोगल सैन्याची दैना केली. राजारामांच्या मृत्यूनंतर अवघ्या २५ वर्षाच्या या लढवय्या स्त्रीने खचून न जाता मोगलांविरूद्ध लढा दिला. त्यांनी स्वतःची राणनीती तयार केली. जोपर्यंत शक्य असेल तोपर्यंत किल्ला लढवायचा व नंतर पैसे घेऊन तो मोगलांच्या हवाली करायचा. पुन्हा पावसाळयाच्या तोंडावर तो किल्ला जिंकून घ्यायचा. या काळातील मराठयांचे धोरण म्हणजे किल्ले जास्तीत जास्त लढविणे, मोगलांची मुख्य फौज अधिक काळापार्यत एकेका किल्ल्यापुढे अडकवून ठेवणे व त्याकाळात इतरत्र मराठयांनी निर्वेध संचार करणे असे होते. यासंदर्भात पगडी म्हणतात, "मराठे हजारो मैल मोगलांना पळायला लावून त्यांची

१ संपा. डॉ. राजा दीक्षित, डॉ. उषा जोशी, डॉ. द. पं. जेशी, समग्र सेतुमाधवराव पगडी खं. २, मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, २७ ऑगस्ट, २०१०, पृ. ९४५.

ISSN : 2348-7143
August-2018

दुर्दशा करून सोडत. अनेकदा मराठयांना घाबरून मोगल सुभेदार बाहेर पडत नसत."[२] या काळात मोगलांनी वेढा घातलेल्या विविध लढायांची माहिती पगडींनी दिली आहे. यामध्ये मोगलांची झालेली हानी, फजिती यांचीही माहिती ते देतात. औरंगजेब मराठे सरदार व अधिकारी यांच्यात फूट पाडण्याचा कसा प्रयत्न करत होता याची माहिती पगडी देतात.[३]

या काळातील मोगल सैन्याची मानसिकता व औरंगजेबाची आगतिकता यांचीही माहिती पगडी देतात. यासाठी साकी मुस्तैदखान, खाफीखान, भिमसेन सक्सेना इ. मोगल इतिहासकारांनी वर्णन केलेल्या साधनांतील माहितीच्या आधारे पगडींनी विश्लेषण केले आहे. ते म्हणतात, "किल्ले घेताना औरंगजेब आपल्या सैन्याला प्रोत्साहान देत असे. मात्र सैनिक एवढे कंटाळलेले होते की ते औरंगजेबाची आज्ञाही मानत नसत."[४] यासंबंधी साताऱ्याचा किल्ला घेताना अनेक मोगल सैनिक मृत्यू पावले, तेव्हाच्या परिस्थितीचे वर्णन साकी मुस्तैदखानाच्या शब्दांत पगडी पुढिलप्रमाणे करतात. "औरंगजेब आपल्या सैनिकांना सारखे उत्तेजन देत होता. मेलेल्यांच्या ढिगाऱ्यावरून चालून किल्लात शिरा असे सारखे सांगत होता. पण त्याच्याकडे कोणीच लक्ष दिले नाही."[५] साताऱ्याच्या किल्ल्याचे नेतृत्व स्वतः औरंगजेब करीत असतानाही मोगल सैन्याच्या या कमकुवत मानसिकतेवर पगडी भाष्य करतात.

या स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात मराठयांनी मोगलांना कसे दमवून जेरीस आणले होते, याचे वर्णन करताना पगडी म्हणतात, "फेब्रुवारी १७०० पासून याच वर्षाच्या जूनपर्यंत धनाजीने झुल्फिकारखानाला शेकडो मैलांची पायपिटी करण्यास लावले."[६] या काळात अनेक ठिकाणी मोगलांच्या अधिकार क्षेत्रातील प्रदेशांवर मराठयांनी स्वतःचा अंमल प्रस्थापीत केला होता. याचे उदाहरण देताना पगडी म्हणतात, "कोकणात कान्होजी आंग्रेंचे बळ हळूहळू वाढत होते. मोगलांच्या ताब्यातील प्रदेशातून त्याने सारावसूली करण्यास सुरूवात केली. मोगल अधिकारी हे मराठयांना शेकडा ५० असा भाग देऊ लागले."[७] यासंबंधी भिमसेन सक्सेना म्हणतो, "या सुमारास नर्मदेच्या दक्षिणेस दख्खन, खानदेश, वऱ्हाड, कोकण या प्रांतातील परगण्यांतून आणि खेडयांतून मराठे हे टोळ आणि मुंग्यांप्रमाणे पसरले होते."[८] अनेक मोगल सरदार मराठयांना सामिल झाल्याची तक्रार तो करतो. तो म्हणतो, "बादशहाने जहागिरदारांना तनखा आणि सरंजाम म्हणून ज्याप्रमाणे तालुके लावून दिले , सरंजाम म्हणून वाटून दिला आहे, त्या प्रत्येक प्रांतात एकाच्या ऐवजी दोन दोन सरंजामदार निर्माण झाले आहेत. मराठे प्रत्येक परगण्यातून आणि प्रत्येक स्थळातून मन मानेल तशा रकमा घेतात."[९] याच अर्थाची माहिती खाफीखानाच्या

---

२ कित्ता, पृ. ११७४.
३ कित्ता, पृ. ११५६.
४ कित्ता, पृ. ११५९.
५ कित्ता.
६ कित्ता, पृ. ११६२.
७ कित्ता, पृ. ११६५.
८ कित्ता, पृ. ११८०.
९ कित्ता.

SHRI PADMAMANI JAIN ... Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

लेखनात आढळते. १७०३ मध्ये मराठयांनी प्रथम प्रथमच गुजरातमध्ये प्रवेश करून पुढे तेथे लागोपाठ स्वाऱ्या करून तो प्रांत संपूर्णपणे आपल्या ताब्यात आणल्याचे पगडी दाखवून देतात.[१०]

मराठयांवर विजय मिळावा यासाठी व आपल्या सैन्याला प्रोत्साहन देण्यासाठी औरंगजेब अधून मधून जिहादच्याही घोषणा देत असे. याकडे पगडींनी लक्ष्य वेधले आहे. यासंदर्भात पगडींनी औरंगजेबाचे एक पत्र उध्दृत केले आहे. "तुम्ही शहाणे आहात .... यावेळी मी जिहाद करीत आहे आणि दुष्ट काफरांचा नायनाट करण्याकरीता अखंड परिश्रम करीत आहे. धर्माचा अभिमान असणाऱ्या प्रत्येक मुसलमानाने यावेळी जिहादात गुंतलेल्या इस्लामच्या बादशहाला मदत केली पाहिजे."[११] औरंगजेबाने मराठयांशी तडजोडीचे प्रयत्न केल्याचेही पगडी नमूद करतात. या संदर्भातील भिमसेन सक्सेनाने दिलेली हकिगत पगडी उध्दृत करतात व पुढे नमूद करतात, "...... पण मोगलांनी मराठयांना थोडेच जिंकून घेतले होते. दख्खनचा तमाम सूभा, काही कष्ट न करता शिऱ्याचा गोळा घशात मिळावा तसा त्यांच्या ताब्यात गेला होता. ते काय म्हणून तहाला प्रवृत्त होतील?"[१२]

दक्षिण भारताच्या मोहिमेवर बादशहाची स्थिती अत्यंत दयनीय झाल्याची माहिती 'इरादतखान' हा औरंगजेबाचा अत्यंत जवळचा सरदार देतो. तो म्हणतो, "औरंगजेबाने विजापूर आणि गोवळकोंडा या राज्यांचा शेवट केला. त्याने संभाजीला पकडले. यानंतर उरलेल्या लहान लहान मोहिम आपण लवकर संपवून टाकू या विचाराने तो दक्षिणेत थांबला. पण त्या मोहिमा इतक्या लांबल्या की बादशहाला शेवटपर्यंत दक्षिण सोडून जाता आले नाही. याबद्दल त्याला नेहमी खेद वाटत असे."[१३] बादशहाची मनःस्थिती काय झाली होती ते यावरून समजते. अशा विमनस्क मनस्थितीतच बादशहाचा शेवट दक्षिणेतच झाला व मराठयांचे स्वातंत्र्ययुद्धही संपुष्टात आले.

या स्वातंत्र्यसंग्रामाच्या शेवटच्या पर्वाचे नेतृत्व ज्या महाराणी ताराबाईने केले, त्यांच्या कर्तृत्वाविषयी खाफीखानाने पुढील गौरवोद्‌गार काढले आहेत, "ताराबाई ही राजारामाची थोरली बायको होय. ती बुद्धिमान आणि शहाणी होती. सैन्याची व्यवस्था आणि राज्यकारभार याबतीत नवऱ्याच्या हयातीतच तिचा मोठा लौकिक झाला होता. रामराजाची (राजाराम) बायको ताराबाई हिने विलक्षण धामधूम उडविली. तित तिचे सैन्याच्या नेतृत्वाचे आणि मोहिमांच्या व्यवस्थेचे गुण प्रकर्षाने प्रकट झाले. त्यामुळे मराठयांचे आक्रमण आणि त्यांची धामधूम दिवसेंदिवस वाढतच गेली."[१४] खाफीखानाच्या शब्दांत "ताराबाईने सगळा कारभार आपल्या हातात घेतला. सरदारांच्या नेमणूका, त्यांच्या बदल्या, राज्याचा कारभार, बादशाही मुलुखावरील हल्ले या सर्व गोष्टी तिच्या तंत्राने चालू लागल्या. तिने आपल्या सरदारांची मने आपल्याकडे ओढून घेतली. तिने आपल्या सैन्याची योजना अशी केली की दक्षिणेचे सहा सुभे, सिरोज, मंदसोर आणि माळवा या प्रांतांच्या सरहद्दीपर्यंत मराठयांनी धामधूम उडविली. बादशहाने आपली हयात मोहिमा करणे आणि किल्ले घेणे यात घालविली. तिच्याविरुद्ध तो

१० कित्ता, पृ. ११८७.
११ कित्ता, पृ. ११६७.
१२ कित्ता, पृ. ११९०.
१३ कित्ता, पृ. ११९६.
१४ कित्ता, पृ. ११८०.

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

शेवटपर्यंत लढत राहिला पण मराठयांचे बळ आणि बंड ही दिवसेंदिवस वाढतच गेली.”[१५] तर भिमसेन सक्सेना म्हणतो, “ताराबाईने इतकी उत्तम व्यवस्था केली की मराठे सरदार तिच्या आज्ञेशिवाय काही करीत नसत.”[१६]

वरील मोगल इतिहासकारांनी काढलेल्या उद्‌गारांतच ताराबाईच्या कतृत्वाचे मूल्यमापन होते, असे पगडींना वाटते. ताराबाईचे मूल्यमापन करताना, तसेच त्यांच्या काळातील स्वातंत्र्यसंग्रामाविषयी पगडी म्हणतात, “अशा पद्धतीने ताराबाईसारख्या पंचवीस वर्षे वयाच्या स्त्रीने औरंगजेबाविरूद्ध लढयाचे यशस्वी नेतृत्व केले. खंबीरपणाने ती उभी राहीली व औरंगजेबाच्या शेवटापर्यंत मराठयांचे राज्य केवळ टिकवलेच नाही तर ते वाढवले देखील.” महाराणी ताराबाईच्या काळातील लढा हा खऱ्या अर्थाने जनतेचा लढा बनला, असे पगडींना वाटते. या काळातील शिवरायांच्या तालमीत तयार झालेले अधिकारी, सरदार व पुढील काळातील सरदार यांचा या लढयाच्या विजयात महत्त्वाचा वाटा असल्याचे पगडी मानतात. या सरादारांना विविध योजना, मोहिमा आखण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. यासंदर्भात पगडी म्हणतात, “वरील सरदारांभोवती मराठी जनता हजारोंच्या संख्येने होती. यामुळे हा लढा जनतेचा बनला. औरंगजेबावर एका राजाशी अथवा राजघराण्याशी लढण्याऐवजी मराठी जनतेशी लढण्याची पाळी आली.”[१७] पुढे ते म्हणतात, “एकिकडे आक्रमक वृत्तीचा, विस्तारवादी, हट्टी, आपल्या धार्मिक धोरणामुळे प्रजेत अप्रिय झालेला औरंगजेब आणि दुसरीकडे मराठी जनता असे या स्वातंत्र्ययुद्धाचे स्वरूप होते.”[१८]

थोडक्यात महाराणी ताराबाई यांच्या काळातील स्वातंत्र्ययुद्ध हे जनतेचे युद्ध बनले. व या यद्धाचे अत्यंत कुशलतेने ताराबाईनी नेतृत्व केले. औरंगजेब, त्यांचे सरदार यांच्यातील संबंधाचा तसेच मोगल सैन्याच्या मानसिकतेचा फायदा करून घेण्यात तर त्याचवेळी मराठी सेनेचा योग्य त्यापद्धतीने उपयोग करून घेण्याात ताराबाई यशस्वी ठरल्या. व यातच त्यांचा विजता व कतृत्व दिसते असे पगडींना वाटते.

१ संपा. डॉ. राजा दीक्षित, डॉ. उषा जोशी, डॉ. द. पं. जेशी, समग्र सेतुमाधवराव पगडी खं. २, मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, २७ ऑगस्ट, २०१०, पृ. ९४५.
२ कित्ता, पृ. ११७४.
३ कित्ता, पृ. ११५६.
४ कित्ता, पृ. ११५९.
५ कित्ता.
६ कित्ता, पृ. ११६२.
७ कित्ता, पृ. ११६५.
८ कित्ता, पृ. ११८०.
९ कित्ता.
१० कित्ता, पृ. ११८७.
११ कित्ता, पृ. ११६७.

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE
Pabal
Tal.Shirur,
Dist.Pune.

---

१५ कित्ता.
१६ कित्ता.
१७ कित्ता, पृ. १२०८.
१८ कित्ता.

ISSN : 2348-7143
August-2018

१२ किता, पृ. ११२० .
१३ किता, पृ. ११९६ .
१४ किता, पृ. ११८० .
१५ किता .
१६ किता .

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403